# निवेदन

देशातील राज्यांच्या भाषावार पुनर्रचनेनुसार महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले आणि या राज्याच्या शासनव्यवहाराची भाषा मराठी राहील असे धोरण शासनाने घोषित केले. शासनव्यवहाराच्या भाषेतील बदल निश्चित कालावधीत योजनाबद्ध रीतीने व सुकरतेने घडवून आणण्याची जबाबदारी भाषा संचालनालयावर सोपविण्यात आली. भाषा सल्लागार मंडळाच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली भाषा संचालनालयाने शासनव्यवहाराच्या भाषाविषयक गरजा भागवू शकतील अशी शासन व्यवहार कोश, पदनाम कोश, प्रशासन वाक्यप्रयोग आणि प्रशासनिक लेखन ही प्रकाशने उपलब्ध करून दिली. त्यामुळे राज्याच्या शासनव्यवहारात राजभाषा मराठीचा अधिकाधिक वापर केला जाण्यास गती प्राप्त झाली. आज राज्याचा शासन व्यवहार जवळपास १०० टक्के मराठीत होत आहे आणि त्यामध्ये या प्रकाशनांचे फार मोठे योगदान आहे.

दरम्यान महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या सहकार्याने शास्त्रीय व तांत्रिक आणि मानविकी विषयांच्या परिभाषानिश्चितीचे काम करण्यासाठी भाषा सल्लागार मंडळाच्या नियंत्रणाखाली विविध विषयांच्या उपसमित्या गठित करण्यात आल्या. या उपसमित्यांनी सिद्ध केलेली विविध विषयांतील परिभाषा भाषा संचालनालयाने प्रसिद्ध केलेल्या ४३ पेक्षाही अधिक परिभाषा कोशांच्या स्वरूपात आज उपलब्ध आहे.

शासन व्यवहार आणि विविध शास्त्रीय व तांत्रिक आणि मानविकी विषय यांची परिभाषा सिद्ध करून ती उपलब्ध करून दिल्यानंतर विधि व न्याय क्षेत्रातील परिभाषा निश्चित करण्याचे काम सुरू करण्यात आले. वास्तविक हे काम विधि अनुवादाच्या स्वरूपात केव्हाच सुरू झालेले होते. राज्य विधानमंडळात सादर केली जाणारी विधेयके आणि राज्य अधिनियम यांचा मराठी अनुवाद करण्याचे काम १९६४ पासून भाषा संचालनालयात सुरू झाले, त्यानंतर केंद्रीय अधिनियमांच्या मराठी अनुवादाचेही काम सुरू करण्यात आले. हे अनुवाद करताना वापर करण्यात आलेल्या मराठी पर्यायांमधून विधि क्षेत्रातील मराठी परिभाषा आपोआप सिद्ध होत गेली. तथापि, त्याबाबतीत एकरूपता आणि संघटितपणा नव्हता. शासनाने, या प्रयत्नांस संघटित स्वरूप प्राप्त व्हावे म्हणून, १९६८ मध्ये भाषा सल्लागार मंडळावर तीन अतिरिक्त विधिज्ञांची नियुक्ती केली. कालांतराने त्यासाठी एक वेगळी विधि उपसमिती गठित करण्यात आली. या उपसमितीने महत्त्वाच्या केंद्रीय अधिनियमांचे मराठी अनुवाद निश्चित करताना वापर केलेले सुमारे १२००० मराठी पर्याय संकलित करून कच्च्या स्वरूपात "न्याय व्यवहार कोश" तयार केला होता.

न्याय व्यवहारात देखील राजभाषा मराठीचा वापर व्हावा यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचे अनेक धोरणात्मक निर्णय घोषित केलेले आहेत. सुरुवात म्हणून जिल्हा स्तरावरील न्यायालयांतून राजभाषा मराठीचा वापर करण्याचा शासनाचा निर्धार होता. त्यानुसार शासनाने दिनांक २१ जुलै, १९९८ रोजी अधिसूचना काढून राज्यातील सर्व दिवाणी व फौजदारी न्यायालयांची भाषा मराठी असेल असे घोषित केले. शासनाने, विधानमंडळात मांडण्यात येणारी सर्व विधेयके मराठी भाषेत असावीत असा निर्णय १९९५ मध्ये घेतलेला आहे.

विधि व न्याय क्षेत्रातील परिभाषा निश्चित करून ती लवकरात लवकर उपलब्ध करून देणे आवश्यक होते. १९९३ पासून निवृत्त न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या "विधि अनुवाद व परिभाषा सल्लागार समिती" कडे हे काम सोपविण्यात आले. समितीने या क्षेत्रातील परिभाषेची निकड लक्षात घेऊन, कच्च्या स्वरूपात उपलब्ध असलेला "न्याय व्यवहार कोश" तातडीने मुद्रित करून घेऊन १९९८ मध्ये राज्यातील सर्व न्यायालयांना उपलब्ध करून दिला व त्याच वेळी ' कोश ' या दृष्टीने सर्व संस्कार करण्यात आलेल्या "न्याय व्यवहार कोशाची" सुधारित आवृत्ती उपलब्ध करून देण्याचा संकल्प सोडला. "न्याय व्यवहार कोशा" ची सुधारित आवृत्ती तयार करीत असतानाच, महत्त्वाच्या अधिनियमांचे मराठी अनुवाद तपासून निश्चित करणे, महत्त्वाच्या न्यायनिर्णयांचा मराठी अनुवाद तपासणे ह्या कामांचीही जबाबदारी समितीवर होती. असे असूनही समितीचे अध्यक्ष माननीय निवृत्त न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी आणि इतर मान्यवर सदस्य यांनी या कोशाच्या निर्मितीमध्ये जे अमूल्य योगदान दिले आहे त्याचा आवर्जून निर्देश करणे आवश्यक आहे. तसेच भाषा संचालनालयातील माझे सहकारी अधिकारी व कर्मचारी यांनी या कोशाच्या निर्मितीसाठी अपार मेहनत घेतलेली आहे या गोष्टीचाही निर्देश करणे आवश्यक आहे.

अशा रीतीने अल्पावधीत सिद्ध केलेला हा न्याय व्यवहार कोश, न्यायाधीश, वकील, कायद्याचे अभ्यासक व इतर सामान्यजन यांच्या हाती देताना आनंद वाटतो.

भाषा संचालनालयात केंद्र सरकारचे निवडक अधिनियम व राज्य शासनाचे सर्व अधिनियम मराठीतून तयार केले जातात. त्यांना अनुवाद न मानता, प्रत्यक्ष मराठीतला कायदाच असल्याचे मानले जाते. त्यांना प्राधिकृत पाठ असे म्हणतात. अशा केंद्रीय व राज्य अधिनियमांच्या, प्राधिकृत पाठांची सूची या कोशाच्या शेवटी दिली आहे.

या कोशातील परिभाषेचा जाणकारांनी आपुलकीने व अभ्यासू वृत्तीने विचार करावा व या परिभाषेचा वापर करताना त्यांच्या नजरेस येणाऱ्या उणिवा भाषा संचालनालयाच्या निदर्शनास आणून द्याव्यात, तसेच ती सुधारण्याच्या दृष्टीने काही सूचना करावयाच्या असल्यास त्या भाषा संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०० ०५१ येथे अवश्य पाठवाव्यात अशी विनंती आहे.

**स्मि. द. मंत्री,**
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.